# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय :- कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/कां.स./ 242 /सन 2023-24

फोर्ट, मुंबई - 400001 दिनांक:- 26.09.2023

**प्रति,**

**शासकीय सहायक अभियोक्ता,**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई.**

**संदर्भ:-** 1. मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.87/2013 मधील दि. 25 जुलै 2016 रोजीचा न्यायनिर्णय.

2. शासन निर्णय क्र.एस-30/2013/प्र.क्र.479/भाग-1/फ-3, दि. 02.09.2016.

3. शासन निर्णय क्र. एस-30/2013/प्र.क्र.479/फ-3, दि.17.10.2016.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने, जनहित याचिका क्र. 87/2013 मधील दि.25 जुलै 2016 रोजीचा न्यायनिर्णयानुसार कोंकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानूसार सदर समितीच्या दरमहा बैठका घेतल्या जातात.

या अनुषंगाने कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीची दि.13.09.2023 रोजी 44 वी बैठक घेण्यात आली असून, सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणाद्वारे मा.उच्च न्यायालयात सादर करावे, ही विनंती.

**(अनिता पाटील)**

**सदस्य सचिव,**

**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**

**तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**प्रतिलिपी :-** अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/ 238 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई 400001 दिनांक- 25/09/2023

**प्रति,**
**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,**
**तथा अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती.**

**संदर्भ:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 44 वी बैठक दि.13.09.2023.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण **समितीची 44 वी बैठक दि**.13.09.2023 रोजी आपले अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे.

तरी, कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

**(अनिता पाटील)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत:- बैठकीचे इतिवृत्त.**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय:-** कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 44 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.
जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 239 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई 400 001 दिनांक: 25/09/2023

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
   जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग.
5. मा. संचालक, पर्यावरण विभाग.
6. मा. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
7. मा. आयुक्त/ सहआयुक्त, महानगरपालिका (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपूर / उल्हासनगर.)
8. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
9. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
10. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
11. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको).
12. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

**संदर्भ :-** या कार्यालयचे पत्र जा.क्र.कक्ष-1/समिती/221/सन 2023-24 दि.05.09.2023.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 44 **वी** बैठक, **बुधवार** दिनांक 13.09.2023 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

(अनिता पाटील)
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

**कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 44 वी बैठक**

**दि.13.09.2023 रोजीचे इतिवृत्त**

**मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई.**

कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 44 वी बैठक समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. महेंद्र कल्याणकर (व्ही.सी.द्वारे) | अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 2. | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 3. | श्री. अभय पिंपळकर (व्ही.सी.द्वारे) | संचालक, पर्यावरण (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 4. | श्रीमती अनिता पाटील | सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 5. | श्री. विशाल मदने (व्ही.सी.द्वारे) | अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (कांदळवन प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 6. | श्री. चंद्रकांत विभूते (व्ही.सी.द्वारे) | उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (पाणथळ प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 7. | श्री. संजोग कबरे (व्ही.सी.द्वारे) | उपायुक्त, (विशेष) | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 8. | श्री.अभिषेक पराडकर (व्ही.सी.द्वारे) | उपायुक्त पनवेल महानगरपालिका | पनवेल महानगरपालिका |
| 9. | श्री. सतीश बागल (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| 10. | श्री. सुदाम परदेशी (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 11. | श्री. संदेश शिर्के (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड | जिल्हाधिकारी रायगड |
| 12. | श्री. सुभाष भागडे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| 13. | डॉ. अरुणा जाधव (व्ही.सी.द्वारे) | अपर तहसिलदार (महसूल), मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| 14. | डॉ. सागर घोलप (व्ही.सी.द्वारे) | उपायुक्त, वसई विरार मनपा | वसई विरार महानगरपालिका |
| 15. | श्री. धनाजीराव धायगुडे (व्ही.सी.द्वारे) | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 16. | श्री. जगदीश वालुनजुवनी (व्ही.सी.द्वारे) | उपअधीक्षक, ट्रॉम्बे | उपनमक कार्यालय, ट्रॉम्बे |
| 17. | श्री. रवीकुमार केव्हीआरके | मुख्य नियोजनकार, सिडको (व्ही.सी.द्वारे) | सिडको कार्यालय (CIDCO) |
| 18. | श्री. सुदेश परब (व्ही.सी.द्वारे) | सहायक आयुक्त, परिमंडळ 1, नवी मुंबई | नवी मुंबई महानगरपालिका |
| 19. | श्री. जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको (व्ही.सी.द्वारे) | सिडको कार्यालय (CIDCO) |
| 20. | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे (व्ही.सी.द्वारे) | ठाणे महानगरपालिका |
| 21. | श्री. प्रशांत मर्दे (व्ही.सी.द्वारे) | सहाय्यक पोलीस आयुक्त | पोलीस उपायुक्त (अभियान), मुंबई |
| 22. | प्रतिनिधी, जिल्हाधिकारी रत्नागिरी (व्ही.सी.द्वारे) | - | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| 23. | प्रतिनिधी, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| 24. | प्रतिनिधी, उप विभागीय अधिकारी, पनवेल | (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| 25. | श्री. संजय केने | (व्ही.सी.द्वारे) | - |
| 26. | श्री. स्टॅलिन डी. (व्ही.सी.द्वारे) | संचालक, वनशक्ती (व्ही.सी.द्वारे) | वनशक्ती |

❖ व्हि.सी. मधील काही उपस्थित सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे फक्त नावांची नोंद केलेली आहे

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीचा तपशील

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| **मुंबई उपनगर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | |
| 1 | **श्री. स्टॅलीन डी.**<br>**(WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>दि. 31.01.2019 | • उपनमक आयुक्त कार्यालय, बेलार्ड ईस्टेट, मुंबई यांच्या दि.14.10.2022 रोजीच्या अहवालानूसार वडाळा सॉल्ट पॅन विभागातील, सॉल्ट पॅन जमीन ही भारत शासनाच्या अखत्यारीत आहे. सदर अहवालानूसार डेब्रिज हटवण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून (MCGM) करण्यात यावी. त्यासंदर्भात त्यांच्याशी अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला आहे, परंतु अद्यापही त्यांच्यामार्फत तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांचे मार्फत वडाळा पोलीस स्टेशनमध्ये FIR No. 265/2020 व No. 358/2021 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.<br>• मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 2 | **श्री.स्टॅलिन डी.**<br>**(WC-109)**<br>Request for restoration of Culvem lake Gorai and also action against destroyers of wetlands.<br>दि. 15.04.2023 | • सदर तक्रारी संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी पर्यावरण विभागाशी समन्वय करुन उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांचे सोबत दोन्ही तक्रारी संदर्भात संयुक्त स्थळपाहणी झाली असल्याचे समितीस चर्चे दरम्यान सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना स्थळपाहणी अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>2. संचालक, पर्यावरण विभाग<br>3. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| 3 | **श्री. हरिष पांडे**<br>**(WC-110)**<br>Destruction of wetland | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | & creek in Gorai Essel world area.<br>दि. 17.04.2023 | | |
| **ठाणे जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | | | |
| 4 | **श्री. स्टॅलिन डी. (WC- 81)**<br>Reclamation of Wetlands on the Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan.<br>Date - 20.01.2020 | • सदर तक्रारी संदर्भात मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांनी कांदळवन क्षेत्रातील भराव उचलताना कांदळवनांचे नुकसान होण्याची शक्यता आहे असे जिल्हाधिकारी, ठाणे यांचे मत असल्याने सदर भराव उचलण्याकरीता वन विभागाच्या मार्गदर्शनाची गरज असल्याचे चर्चे दरम्यान सांगितले.<br>• त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, कुर्ला यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे यांचेशी संपर्क करुन स्थळपाहणीबाबतचे नियोजन करावे असे मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांस सांगितले.<br>• सदर तक्रारीबाबत मा.अध्यक्ष यांनी ठाणे महानगरपालिकेने वन विभाग यांचे कार्यालयाशी संपर्क करुन भराव उचलण्याची तात्काळ कार्यवाही करावी तसेच खाजगी जागेच्या जमिनीवर कांदळवनाचे नुकसान केल्यामुळे संबंधितांना नुकसान भरपाईबाबत नोटिसा जारी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, ठाणे महानगरपालिका |
| 5 | **श्री. सुनील अगरवाल (WC- 92)**<br>Mangroves and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane.<br>Date - 14.12.2019<br>(सदर तक्रार पाणथळ समितीकडे वर्ग झाली | • तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे यांचे दि.04.04.2020 रोजीच्या अहवालानूसार त्याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झालेला नाही तसेच जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या दि.08.09.2023 रोजीच्या अहवालानूसार तक्रारीतील नमुद क्षेत्र हे पाणथळ क्षेत्र नसल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी समितीस सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशांच्या प्रतीं किंवा वेटलँड ॲटलास नकाशे केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | आहे) | | |
| 6 | **श्री. सुनील अगरवाल.** (WC- 96) Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai. Date – 24.09.2022. | • उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार सदर जागा खाजगी व्यक्तीस सुपूर्द करण्यात आलेली असल्याचे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना उपअधीक्षक ट्रॉम्बे, मीठागरे विभाग यांचेशी समन्वय साधून तक्रारीतील नमूद जागा सर्व्हे क्रमांकानूसार मीठागरे विभागाच्या अखत्यारीत येते अथवा नाही याची तपासणी करुन त्याबाबतचा लेखी अहवाल मीठागरे विभागाकडून प्राप्त करुन घ्यावा तसेच सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसल्यास तहसीलदार, ठाणे यांना सूचना (Guideline) देऊन समितीचे अशासकीय सदस्य श्री.स्टॅलीन डी. यांचे सोबत सदर बांध मोकळे करण्याचे आदेश द्यावे असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले. | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, मीठागरे विभाग<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 7 | **श्री. स्टॅलिन डी** – (WC- 102) Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul. Date – 08.10.2022. | • सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर जागेवर काही स्थानिक मच्छीमार समाजातील लोकांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याची भरती व आहोटी दरम्यान संचालन करत असल्याचे निदर्शनास आले. यात त्यांचा मच्छीमारांचा हेतू असल्याचे आढळून येत असून या ठिकाणी सिडको ने भू-विकासाचे कुठलेही कार्य हाती घेण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात मा.अध्यक्ष यांनी सिडको यांच्या अहवालाच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. नवी मुंबई महानगरपालिका |
| 8 | **श्रीमती श्रुती अग्रवाल** दि. 28.02.2023 **व श्री. स्टॅलिन डी. दि.** 01.03.2023 (WC-105) 1.Blockage of water in the wetlands behind NRI complex. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **श्री. प्रदीप पाटोले** दि.16.05.2023.<br>1. NRI complex Survey No.22 a huge Mangrove patch is in possession of CIDCO. | | |
| 9 | **श्री.निशांत बांगेरा –** (WC - 104)<br>Reclamation of Railadevi Lake, Thane | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान तलावाचे काम सद्यस्थितीत थांबविले असून भविष्यात तलावातील गाळ काढण्याकरीता वनविभागाच्या मान्यतेने एक Standard Operating Procedure (SOP) तयार करण्यात येणार आहे. तसेच NGO व वन्यजीव तज्ञ यांचे सोबत एक समिती स्थापन करुन त्याच्या सूचनेनूसारच पुढे काम करण्यात येईल आणि यापुढे तलावाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे ठाणे महानगरपालिका यांच्या प्रतिनीधींनी सांगितले होते.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांना Standard Operating Procedure (SOP) तयार केल्याबाबत तसेच NGO व वन्यजीव तज्ञ यांचे सोबत कमिटी स्थापन केल्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले.<br>• सोबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अहवाल जोडून देण्यात यावा असे आदेश मा.अध्यक्ष यांनी दिले. | 1. ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **रायगड जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 10 | **श्री.स्टॅलिन डी. (WC- 87)**<br>Destruction of coastal Wetlands in Kharghar Sector 16. | • सिडको विभागाच्या दि.08.03.2023 रोजीच्या संयुक्त स्थळ पहाणी दरम्यान सदर जाळया श्री. मुझाम्मिल पटेल व इतर यांच्या असल्याचे समजले असून, दि.23.03.2023 रोजीच्या नियंत्रक, अनाधिकृत बांधकामे यांच्या अहवालानूसार सदर जागेवरील जाळया काढण्यात आलेल्या असून सोबत सदर जागेचे छायाचित्रे जोडण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. | 1. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>2. जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि. 05.01.2021 | • सदर तक्रारीबाबत संयुक्त स्थळपाहणीकरीता तक्रारदार यांना बोलविण्यात आलेले नसल्याचे श्री. स्टॅलिन डी. यांनी चर्चे दरम्यान सांगितले. तथापि मा.अध्यक्ष यांनी तक्रारदार यांचेसोबत पुन:श्च स्थळपाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करावा असे वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण), सिडको तसेच निवासी उप जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले. | |
| 11 | **श्री. स्टॅलिन डी – (WC- 100)**<br>Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed.<br>Date -12.07.2022. | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 12 | **श्री. स्टॅलिन डी – (WC- 101)**<br>Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland.<br>Date – 28.09.2022 | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, रायगड |
| 13 | **श्री. बी.एन.कुमार – (WC - 103)**<br>10 acres of Kharghar wetland | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | systematically buried<br>Date : 04.01.2023. | दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | |
| 14 | **श्री.बी.एन.कुमार**<br>**(WC-106)**<br>NMSEZ IT Hub on Mangrove-wetland graves-Request to stop it.<br>दि : 08.03.2023 | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधी सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 15 | **श्री. बी.एन.कुमार**<br>(WC-111)<br>Reclamation of Dastan, Savarkhar intertidal waters complete.<br>दि. 23.04.2023 | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधी सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट<br>2. जिल्हाधिकारी, रायगड<br>3. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>4. संचालक, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **पालघर जिल्हयातील कांदळवन तक्रारी** | |
| 16 | **श्री. दामोदर शिंगडा (WC-86)** वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत.<br>Date - 26.12.2022 | • वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार गाव-मौजे धोवली, स.नं.109 ते 115 या जमिनीवर दि.17.12.2020 रोजी तालुका स्तरीय कांदळवन समिती यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही. तसेच माहे जानेवारी 2013 मध्ये उक्त स.नं.109 या जमिनीवर भराव होऊन कांदळवनाचे नुकसान झाल्या प्रकरणी वसई पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजी नंबर-02/2013 दि.12.01.2013 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी पालघर |
| 17 | **श्री. निलेश विनायक जोशी (WC- 95)** पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार.<br>Date - 21.12.2021 | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | **श्री.दिपक बारीया (WC-107)**<br>तत्कालीन वसई तहसिलदार यांनी "पाणथळ तक्रार निवारण समिती" यांना सादर केलेले खोटे अहवाल व आरोपीत इसमासोबत स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन शासकीय कर्तव्य बजावण्यात केलेला कसूर ह्या बाबत. दि. 26.03.2023 | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.28.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर तक्रारी संदर्भात दिनांक 04.07.2023 रोजी स्थळ पहाणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी पाणथळाचा तसेच कांदळवनाचे ऱ्हास / नुकसान झालेले नसून कोणत्याही प्रकारचा भराव केल्याचे दिसून आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशे किंवा वेटलँड ॲटलास नकाशांच्या प्रती केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1. जिल्हाधिकारी पालघर |
| 19 | **श्री.फ्रान्सिस डिसोजा (WC-108)**<br>भुईगाव खुर्द व बुद्रुक हद्दीतील सरकारी मालकीच्या सर्व्हे नं.164 या पाणथळ खार जमिनीवर बेकायदा भराव व बेकायदा रस्त्याचे बांधकाम करीत असलेल्या गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत.<br>दि. 31.03.2023 | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• त्याअनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश दिले. | 1.जिल्हाधिकारी पालघर |

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या दि.13.09.2023 रोजीच्या बैठकीतील तक्रारींचा सद्यस्थितीचा जिल्हानिहाय गोषवारा

| जिल्हा | एकूण तक्रारी | निकाली काढण्यात आलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | 0 | 0 | 0 |
| मुंबई उपनगर | 3 | 0 | 3 |
| ठाणे | 4 | 0 | 4 |
| पालघर | 4 | 0 | 4 |
| रायगड | 8 | 0 | 8 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 0 |
| सिंधुदुर्ग | 0 | 0 | 0 |
| एकूण | 19 | 0 | 19 |

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग